Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2502I01S01V13P0003

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'25
Issue–II(I), Volume–XIII

# भारतीय संविधान व डॉ. बाबासाहेब आंबेडकर

**प्रा. डॉ. हरिश्चंद्र गोविंदा बोरकर**
यशवंतराव चव्हाण कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, लाखांदूर जि. भंडारा ४४१८०३
मो.क्र. ७०६६३४१८६५
ई.मेल harishborkar1965@gmail.com

## सारांश–

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार परमपूज्य विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी हा माणूस राजवट व मानवी संस्कृती यांचा मानवावर होणारा अमाणूष अत्याचार दूर करण्याकरिता आपल्या भारतीय संविधानामध्ये सर्वांना सार्वभौमिक अधिकार प्राप्त व्हावेत व स्वतंत्र प्रतिष्ठा प्राप्त व्हावी.याकरिता स्वातंत्र्य,समता,बंधुता व न्याय या तत्त्वावर भारतीय समाजाची पुनर्घटना व्हावी अशी बाबासाहेबांची इच्छा होती.त्याकरिता त्यांनी सर्व लोकांना राष्ट्रीय एकात्मतेच्या माध्यमातून एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला.

**बीज शब्द** – मानवी संस्कृती,सार्वभौमिक,व्यक्ती व स्वातंत्र्य,एकत्रीकरण,राष्ट्रीय एकात्मता.

## प्रस्तावना –

मानसांना गुलाम बनवून त्यांच्यावर अबाधित राज्य करणाऱ्या स्वेच्छाचारी, सर्वाधिकारी शासकांच्या अमानुष राजवटीचा मानवी संस्कृतीला अनुभव आहे. प्रबळांचे दुर्बलांवर स्वामित्त्व लादण्यास अनेक युक्त्या योजण्यात आल्या. हुकूमशाही, राजेशाही, पुरोहितशाही व अन्य निरंकुश शासन पध्दतींनी आपल्याच शासन अधिकाऱ्यांना मान्यता देण्यास अनेक सिध्दांताची रचना केली. कित्येकदा शासन वर्गाने आम्हीच रयतेचे उध्दारक आहोत म्हणून आम्हाला राज्य करण्याचा अधिकार आहे. परंतू मानवी स्वातंत्र्याचा पवित्र अधिकार हा अबाधित राहिला. आधुनिक जगातील राष्ट्रांनी स्वीकारलेल्या संयुक्त राष्ट्राच्या मानवाधिकाराच्या सार्वभौमिक जाहिरनाम्यात अग्रक्रमाने हे मान्य करण्यात आले आहे की, ''सर्व मनष्यप्राणी जन्माने स्वतंत्र प्रतिष्ठा आणि हक्क या दृष्टीने समान आहेत.''

भारतीय राज्यघटनेचे मुख्य शिल्पकार डॉ. भिमराव रावजी आंबेडकर हे देशात व देशाबाहेर आधुनिक मनू आणि न्यायशास्त्री म्हणून ओळखले जातात. त्यांची बुध्दिमत्ता लक्षात घेऊन स्वतंत्र भारताची राज्यघटना मसुदा समितीचे अध्यक्षपद त्यांना देण्यात आले.

स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर घटना समिती सार्वभौम झाली. त्यानुसार ब्रिटीश संसदेने भारतासाठी संमत केलेला कोणताही कायदा रद्द करण्यात तसेच कोणत्याही कायद्यात सुधारणा किंवा बदल घडवून आणण्यास घटना समिती सक्षम होती. १५ ऑगष्ट १९४७ रोजी पं. जवाहरलाल नेहरुंनी जाहिर केले की, '' Freedom and Power bring responsibility.That responsibility rest on the consitutuent assembly,a sovereign body,representing the sovereign people of India.'' घटना समितीने आपल्या सभासदांच्या अनेक उपसमित्या तयार केल्या. त्यापैकी महत्त्वाची समिती म्हणजे घटनेचा मसुदा समिती होय. दि. १९ ऑगष्ट १९४७ रोजी घटनेच्या मसुदा समितीच्या अध्यक्षपदी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची निवड करण्यात आली. या मसुदा समितीमध्ये एकुण सात सदस्य होते. १. ''श्री. अल्लादी कृष्णस्वामी अय्यर,२ श्री.गोपालस्वामी अयंकर ३ डॉ.बाबासाहेब आंबेडकर ४. श्री.के.एम.मुन्शी ५. श्री. सईद मो.सादुल्ला ६. श्री.बी.एल. मित्तल आणि ७. श्री. डी.पी. खेतान ही सभासद मंडळी श्री. सत्यनारायण सिन्हा यांच्या ठरावाने घेतल्या गेली.''

मसुदा समितीच्या अध्यक्षपदावर डॉ. आंबेडकरांची निवड झाल्यानंतर पं.नेहरुंचे सेक्रेटरी एम.ओ. मथाई आणि डॉ. आंबेडकर यांची भेट झाली. डॉ. आंबेडकरांच्या मनाचा वेघ घेण्यासाठी या दोघांमधील संवाद अत्यंत महत्त्वाचा वाटतो. डॉ. आंबेडकर एम.ओ. मथाईंना म्हणतात, ''हिंदूना महाभारत हवे होते. तेव्हा त्यांना व्यास मिळाला, तो शुद्र होता. हिंदुना रामायणाची आवश्यकता भासू लागली, तेव्हा त्यांना वाल्मिकी मिळाला. तोही शुद्र होता. आता हिंदुना राज्यघटना हवी आहे. यावेळी मला बोलाविले मीही शुद्रच. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या उपरोक्त विधानातील विनोदाचा भाग सोडला तर त्यांच्या विधानातील गंर्भितार्थ बरेच काही सांगून जातो.''

दि. ०९ डिसेंबर १९४६ रोजी घटना समितीची पहिली सभा झाली व दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी घटना समितीने भारताचे संविधान स्वीकृत केले. घटना समितीच्या या कार्यास २ वर्ष ११ महिने १८ दिवस एवढा अवधी लागला. घटनेच्या मूळ मसुद्यात २४३ कलमे व १३ परिशिष्टे होती. त्यानंतरच्या शेवटच्या स्वरुपात ३९५ कलमे व ८ परिशिष्टे होती. आज भारतीय राज्यघटना एकुण २४ भागात व १२ परिशिष्टात विभागली गेली असून त्यामध्ये सुमारे ४४८ कलमे आहेत. भारतीय संविधानातील प्रमुख अंगे १. सांसदीय लोकशाही २. मूलभूत हक्क आणि न्यायालयीन यंत्रणा ३. मार्गदर्शक तत्त्वे ४. केंद्र राज्य संबंध आणि ५. घटना दुरुस्ती ही आहेत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना एकेक कलम घटना सभेकडून मान्य करून घेतांना दूरदृष्टी ठेवून अनेक सुधारणा सूचविल्या व मान्य करून घेतल्या. नेहरूंच्या प्रिॲम्बलमध्ये 'बंधुभाव' हा शब्द नव्हता.तो बाबासाहेबांनी सूचविला व दुरुस्ती केली. तसेच नेहरुंच्या 'फेडरेशन' या ऐवजी 'युनियन' हा शब्द सूचविला व मान्य झाला. सरदार पटेलांच्या 'गव्हर्नर' निवडीबाबतही दुरुस्ती सूचविली. गव्हर्नर हा राष्ट्रपतींनी नेमलेला असावा हे मान्य करुन घेतले. तसेच 'पटेलांच्या कोणत्याही वर्गाच्या' ऐवजी बाबासाहेबांनी 'कोणत्याही मागासलेल्या वर्गाच्या' अशी दुरुस्ती करून राखिव जागा ठेवल्या. जाती व जमाती हे देखिल मागासवर्गीयच आहेत असे स्पष्ट केले. तसेच 'गॅरंटी इन' च्या ऐवजी 'कौन्फर्ड बाय' हा शब्द टाकला. 'इनडिपेंडेंट' ऐवजी 'डेमाक्राटिक' हा शब्द घातला. नको ते काढून टाकले, आवश्यक तेवढेच ठेवले. विरोध मात्र झाला नाही,केला नाही. कसे करणार?

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कायदा हे सामाजिक परिवर्तनाचे साधन मानले. त्यांच्या दृष्टीने संविधानात कृतिशील आणि कल्याणकारी शासनाला सामाजिक, आर्थिक न्यायावर समाजव्यवस्था, अर्थव्यवस्था यांची पुनर्बांधणी करावयाची आहे.

डॉ. बाबासाहेबांच्या मनावर इंग्लंडमधील संसदीय लोकशाहीचा पगडा जास्त बसला होता. कारण ते उच्च शिक्षणाकरिता इंग्लंडला राहिले होते. इंग्लंडप्रमाणे भारततही द्विपक्ष पध्दतीवर आधारलेली संसदीय लोकशाही निर्माण करावी अशी बाबासाहेबांची इच्छा होती. लोकशाहीत समर्थ विरोधी पक्षाचे अस्तित्त्व असले पाहिजे. कारण समर्थ विरोधी पक्ष हा लोकशाहीचा पाया असतो. समर्थ विरोधी पक्षामुळेच लोकशाहीची वाढ व विकास होते. त्यातून व्यक्ती व स्वातंत्र्य मागण्याचे अस्तित्त्व जिवंत राहते. डॉ. बाबासाहेब लोकशाहीचे खरे उपासक होते. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या तत्त्वावर भारतीय समाजाची पुनर्घटना व्हावी अशी बाबासाहेबांची इच्छा होती.

कॉंग्रेस पक्षाला विरोध करणारा समर्थ असा विरोधी पक्ष देशात अस्तित्त्वात नव्हता आणि लोकशाहीचे जतन करायचे असेल तर विरोधी पक्ष असणे गरजेचे आहे. कॉंग्रेस पक्षात व्यापारी, श्रीमंत, कारखानदार अशा लोकांचा समावेश असल्यामुळे गरीब लोकांची बाजू मांडणारा कोणीच व्यक्ती नसल्यामुळे तेव्हा सामान्य माणसांचे हितसंबंध जोपासण्याकरिता डॉ. बाबासाहेबांनी स्वतंत्र मजूर पक्ष काढला. केवळ अस्पृश्य जातीचा हा पक्ष नसून सर्वच जातीच्या शेतकरी, कामकरी, मध्यम वर्गातील कामकरी आणि किरकोळ व्यापारी यांचे रक्षण त्यांना विशेष हक्क व सवलती मिळवून देणे हा या पक्षाचा उद्देश होता.

समाजातील इतर वर्ग व दलित वर्ग यांच्यात सुसंवाद राखण्यासाठी मजूर पक्षाची स्थापना केली. गरीब वर्गातील लोकांसाठी संघटित शक्तीने चळवळ करता यावी. याच काळात दुसरा एक पक्ष कामगार वर्गात निर्माण झाला होता. कायदे मंडळात या पक्षाचे बहुसंख्ये सदस्य निवडून आणून त्यांची स्थिती सुधारु शकतील असे कायदे पास करण्याच्या उद्देशाने डॉ. आंबेडकरांनी या पक्षाची निर्मिती केली.

मूलभूत अधिकाराच्या जाहिरनाम्यात कायद्यापुढे सर्व समान आहेत. धर्म,जात,लिंग, वंश या कारणांवरून कोणताही पक्षपात केला जाणार नाही हे महत्त्वाचे कलम घालण्यात आले. ज्या समाजात विषमतेची किड लागलेली होती, त्या समाजात केवळ कायद्याने समानता आणून भागणार नाही. त्यांना पूर्वीच्या व्यवस्थेत हजारो वर्षे शिक्षणास व समान संधीस वंचित करण्यात आले होते. त्यांना काही वर्षे तरी विशेष संधी देणे आवश्यक होते. याकरिता मार्गदर्शक तत्त्वांमध्ये अनुसूचित जाती , जमातीच्या आणि समाजातल्या दुबळ्या गटांसाठी विशेष तरतुदी करण्याची जबाबदारी शासनावर टाकण्यात आली. सरकारी नोक—यांच्या बाबतीत जागांचीही तरतूद करण्यात आली. (कलम ४६) राज्यघटनेत अनुसूचित जाती, जमातीचा स्पष्ट उल्लेख आहे. कलम १६(५) परंतू त्याव्यतिरिक्त लोक असे होते की, ज्यांना सामाजिक आणि आर्थिक बाबतीत स्पर्धा करणे शक्य नव्हते, त्यांना काही काळ तरी राखीव जागांची सोय करणे आवश्यक होते. मागासवर्गीय अशी शब्द योजना कलम १६(४) मध्ये करण्यात आली.

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with* International Impact Factor 8.357
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ/2502I01S01V13P0003

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research Feb'25
Issue–II(I), Volume–XIII

या राज्यघटनेत अस्पृश्यतेचे उच्चाटन केलेले आहे. प्रौढ मतदान व अस्पश्यांसह सर्व मागास जातींना व मानव समाजाच्या परिघाबाहेर ठेवलेल्या आदिम जमातींना ३३० ते ३४२ कलमान्वये घटनात्मक संरक्षण दिले आहे. त्याचप्रमाणे कलम ३४० अन्वये भारतातील सामाजिक व शैक्षणिक दृष्टया मागासलेल्या वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी संरक्षण दिले आहे. याच कलमाद्वारे मंडल आयोगाची स्थापना झाली होती. राज्यघटनेचा केंद्रबिंदू माणूस आहे. यामागील भूमिका डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात, ''देशाच्या इतिहासात खेडयातील जाती–जमाती तशाच राहिल्या. त्या नीच व अपमानित पातळीवर जिवंत राहिल्या आहेत. त्यामुळे खेडयांचा अव्हेर करुन घटना मसुद्यात व्यक्तिला घटक मानण्यात आले आहे याबद्दल मला आनंद वाटतो.''

## निष्कर्ष —

डॉ. बाबासाहेब आंडकरांनी भारतीय राज्यघटनेत विभिन्न प्रदेशांचे एकत्रीकरण करुन राष्ट्रीय एकात्मता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. त्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्यायांचा अंतर्भाव केला. संविधानाच्या माध्यमातून आपल्या राष्ट्रीय तत्त्वज्ञानात डॉ. आंबेडकरांनी बुध्दिमत्ता, जनतंत्र आणि सांसदीय शासन प्रणाली, अधिकार आणि कर्तव्य, परंपरा आणि आधुनिकता इत्यादीचे एकत्रित रुप प्रस्तूत केले. डॉ. आंबेडकरांनी या देशाची राज्यघटना लिहून या देशावर एकप्रकारे घटनेच्या माध्यमातून या देशाला विकासाच्या दिशेने प्रगतीशील करणे आणि स्वातंत्र्य , समता, बंधुता व न्याय या मानवी मूल्यांची प्रतिष्ठापना करण्यासाठी सिध्द होणे यातूनच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ऋणातून मुक्त होता येईल.

## संदर्भ ग्रंथ —

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ — डॉ.पी.ए. गवळी
२) भारताचे संविधान — संपादक — प्रदिप गायकवाड
३) क्रांती महाजन — महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर —सुविधा प्रकाशन पुणे
४) Dr.Babasaheb Ambedkar Writing and Speeches Vol.13, P.No.229
५) शंकरराव गणपतराव नगराळे — डॉ. बाबासाहेब आंबेडकर विश्वरत्न कसे ? सुधीर प्रकाशन वर्धा
६) प्रा. गौतम निकम — बहुजन उध्दारक डॉ. बाबासाहेब आंडेकर — कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.